MHKO030006152015

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | ०३/०२/२०१५. |
| नोंदणी दिनांक | - | ०३/०२/२०१५. |
| निकाल दिनांक | - | १०/०३/२०२६. |
| कालावधी | - | वर्षे महिना दिवस. |
| | | **११ ०१ ०७.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४ कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी: शिल्पा वि. कुलकर्णी),**

**सं.फौ.ख.क्र.४२०/२०१५.** **निशाणी क्रमांक २४/ब.**

**गु.र.क्र.१९८/२०१४.**

**दोषारोप –** भा.दं.वि.सं.कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का.कलम १८४, १३४(ब) प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**जुना राजवाडा पो.ठा., कोल्हापुर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्रीमती आर.आर.देशपांडे. |
| **आरोपी** | | **माणिक कृष्णात खलाटे,**<br>**वय -** ४४ वर्षे, **धंदा –**<br>रा.रामानंदनगर दत्त कॉलनी, प्लॉट न.२/७८४, कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री.एस.एम.नसलापुरकर. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | १२/०७/२०१४. |
| गुन्हा दाखल दिनांक | | २७/१०/२०१४. |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | ०३/०२/२०१५. |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | | १७/०५/२०१९. |
| साक्षी पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | ३०/०१/२०२३. |

| | | |
|---|---|---|
| साक्षी पुरावा संपल्याचा दिनांक | | १२/०२/२०२६. |
| युक्तिवाद दिनांक | | १०/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय दिनांक | | १०/०३/२०२६. |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | भा.ना.सु.सं.कलम ४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माणिक खलाटे | १८/११/ २०१४ | १८/११/ २०१४ | भा.दं.वि.सं.कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा. का.कलम १८४, १३४ब प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | जगन्नाथ खंडेराव नागवेकर | १० | जखमी. |
| ०२ | नेमिनाथ रामचंद्र कापसे | २० | पंच. |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | १२ | जखमीचा जबाब. |
| ०२. | २१ | पंचनाम्यावरील अनु.क्र.०२ वरिल स्वाक्षरीस. |
| ०३. | १३ | पंचनामा. |
| ०४. | २२ | हॉस्पीटलचे प्रमाणपत्र. |
| ०५. | २३ | मेकॅनिकलचा दाखला. |

# न्या य नि र्ण य

**(घोषित दि.१० मार्च, २०२६ रोजी.)**

आरोपीवर भा.दं.वि.सं.कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४, १३४ब अन्वये आरोप ठेवून सदरचा खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन**

**०२.** दि.१२/०७/२०१४ रोजी १९.२० वा.चे सुमारास नंगीवाली मशीद ते संभाजीनगर जाणा-या रोडवर टिंबर मार्केट कमानीसमोर रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र.एम.एच.०९ वाय.८५०५ ही भरधाव वेगाने, हयगयीने, बेदरकारपणे, निष्काळजीपणे, अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविले व पादचारी जगन्नाथ खंडेराव नागवेकर यांना जोराची धडक दिली. त्यामुळे त्यांच्या डाव्या पायास गंभीर मार लागून गुडघ्याच्या खाली फ्रॅक्चर झाले तसेच आरोपी अपघाताची वर्दी न देता पळुन गेला. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरूध्द जुना राजवाडा पो.ठा. येथे फिर्याद दिली. त्यानंतर प्रथम खबर अहवाल दाखल केला. प्रथम खबर अहवाल दाखल केल्यानंतर गु.र.क्र.१९८/२०१४ नोंदविला. त्यानंतर तपास तपासणी अधिकारी पो.हे.कॉ.श्री.डी.पी.सुतार यांच्याकडे सुपुर्त केला. त्यांनी अपघाताची सखोल चौकशी केली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र कामात सामील केले व अपघातस्थळाचा पंचनामा करून तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर माझ्या पुर्वाधिकारी यांनी त्याच्यावर भा.दं.वि.सं.कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४, १३४ब प्रमाणे प्रतिकथन नि.क्र.११ लगत नोंदविले. आरोपीस प्रतिकथन त्याचे भाषेत वाचून आणि समजावून सांगणेत आले असता त्याने निवेदनाप्रमाणे ते नाकारुन प्रकरण

चालविण्याची विनंती केली. आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ नुसार निवेदन निरस्त करण्यात आले. तसा आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आला आहे.

**०४.** अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद पाहता खटल्याच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्याचे उत्तर कारणांसहीत नोंदवत आहे.

| अ.क्र | मु द्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१२/०७/२०१४ रोजी १९.२० वा.चे सुमारास नंगीवाली मशीद ते संभाजीनगर जाणा-या रोडवर टिंबर मार्केट कमानीसमोर रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र. एम.एच.०९ वाय.८५०५ ही मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवली व पादचारी जगन्नाथ खंडेराव नागवेकर जोराची धडक दिली ? | **नकारार्थी.** |
| **०२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद दुचाकी हयगयीने, अविचाराने चालवून पादचारी जगन्नाथ खंडेराव नागवेकर यांना जोराची धडक देऊन त्यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत झाले ? | **नकारार्थी.** |
| **०३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद दुचाकी | |

| | | |
|---|---|---|
| | हयगयीने, अविचाराने चालवून पादचारी जगन्नाथ खंडेराव नागवेकर यांना जोराची धडक देऊन त्यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत झाले ? | **नकारार्थी.** |
| **०४.** | अभियोगपक्ष हे सिध्द करत आहे काय की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद दुचाकी भरधाव वेगाने व इतरांच्या जिवितास धोका पोहोचेल अशा पध्दतीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले व जी काळजी घेणे अभिप्रेत होते ती घेतली नाही ? | **नकारार्थी.** |
| **०५.** | अभियोगपक्ष हे सिध्द करत आहे काय की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद दुचाकीने अपघात केला व अपघाताची वर्दी जवळच्या पोलीस ठाण्यात न देता पळून गेला ? | **नकारार्थी.** |
| **०६.** | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०६ करिता**

**०५.** मुद्दा क्र.०१ ते ०५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता प्रस्तुतचे मुद्दे हे एकत्रीतरित्या विचारात घेणेत येत आहेत. आरोपीवर असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

**०६.** साक्षीदार क्र.०१ जगनाथ खंडेराव नागवेकर (जखमी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१२/०६/२०१४ रोजी ते संभाजीनगर येथे टिंबर मार्केट कमाणीसमोर ब्रेड आणण्याकरीता श्री बेकरीकडे जात असताना संध्याकाळी

०७.३० वाजता त्यांचा अपघात झाला. ते रस्ता क्रॉस करत असताना दुचाकीने त्यांना धडक दिली. त्यावेळी पाऊस पडत होता. त्यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्याला मार लागुन पाय फ्रॅक्चर झाला. त्यांना लोकांनी दवाखान्यात दाखल केले. गाडीचा क्रमांक व गाडी चालकाचे नाव त्यांना आठवत नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. जबाबावर त्यांची सही (नि.क्र.१२) आहे. त्यांनी मोटारसायकल - स्वारास पाहिले नव्हते. त्याचे नाव, गाव, त्यांना माहिती नाही. सदरचा अपघात मोटारसायकल स्वाराच्या चुकीमुळे झाला.

**०७.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्याने मान्य केले की, घटनास्थळ रहदारीचा रस्ता आहे. त्यावेळी रस्ता उकललेला होता. त्यादिवशी पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले होते. ते अपना बँकेसमोर पडले. मोटार सायकल डीव्हायडरच्या दुस-या बाजुने येत होती. ज्या ठिकाणी ते पडले तेथे डीव्हायडर २० फुट अंतरावर आहे. साक्षीदाराने पुढे असे देखील मान्य केले की, त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. सदर कामी आणखी साक्षीदार तपासावयाचे नाहीत.

**०८.** साक्षीदार क्र.०२ नेमिनाथ रामचंद्र कापसे (पंच) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१३/०७/२०१४ रोजी त्यांना जुना राजवाडा पोलीसांनी पो.ठा.त बोलाविले होते. तेथे त्यांची तयार पंचनाम्यावर सही घेतली पंचनाम्यावरील अनु.क्र. ०२ वर त्यांची सही (नि.क्र.२१) असून त्यातील मजकुराबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्याचा उलट तपास घेतला असता कोणताही गुन्हादर्शक पुरावा त्याच्या साक्षीत आला नाही.

**०९.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द फिर्यादीचे अनुषंगाने कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. सदर कामातील महत्वाचा साक्षीदार क्र.०१/जखमी

यानेच आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे कथन केले आहे. तसेच पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. सदर कामी सदर साक्षीदारांची साक्ष गुन्हा सिध्द होण्यास पुरक ठरत नाही. आरोपीचा घटनेशी संबंध जोडणारा कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने अभियोगपक्ष हा आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेस अपयशी ठरलेला आहे. अभियोग पक्षास पूरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजेर ठेवू शकला नाही. सदर प्रकरणात घटना स्थळावरील कोणताही परिस्थितीजन्य पूरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र.एम.एच.०९ वाय.८५०५ ही भरधाव वेगाने, हयगयीने, बेदरकारपणे, निष्काळजीपणे, अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविले व पादचारी जगन्नाथ खंडेराव नागवेकर यांना जोराची धडक दिली. त्यामुळे त्यांच्या डाव्या पायास गंभीर मार लागून गुडघ्याची खाली फ्रॅक्चर झाले तसचे आरोपी अपघाताची वर्दी न देता पळुन गेला ही बाब सिध्द झालेली नसून अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेल्या केसवर संशय निर्माण होतो. न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपी पक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपीस देवून त्याला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित वाटते. करिता मुद्दा क्र.०१ ते ०५ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०६ करिता खालील आदेश पारित करणेत येत आहे -

## <u>आ दे श</u>

**०१.** आरोपीस फौ.प्र.सं.कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.सं.कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का.कलम १८४, १३४ब प्रमाणे गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**०२.** आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

**०३.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे र.रु.१५,०००/-(पंधरा हजार रुपये फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा द्यावा.

*(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.03.11 11:57:13 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.१०/०३/२०२६.